www.PapaCambridge.com

Cambridge International A Level

**Cambridge International Examinations**
Cambridge International Advanced Level

**MARATHI** **9688/04**

Paper 4 Texts **October/November 2014**

**2 hours 30 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, glue or correction fluid.
DO **NOT** WRITE IN ANY BARCODES.

Answer any **three** questions, each on a different text. You must choose **one** question from Section 1, **one** from Section 2 and **one other**.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You may **not** take set texts into the examination.
You should write between 500 and 600 words for each answer.
You are advised to divide your time equally between your answers.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्वप्रथम खालील सूचना वाचा**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.
उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, रोल नंबर व तुमचे नाव लिहा.
गडद निळ्या अथवा काळ्या पेनने लिहावे.
स्टेपल, पेपर क्लिप, डिंक किंवा दुरूस्त्यांसाठी द्रवपदार्थ वापरू नये.
कोणत्याही बारकोडवर **लिहू नये**.

कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा. प्रत्येक प्रश्न हा वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांवर आधारित असावा.
विभाग 1 मधून **एक** प्रश्न, विभाग 2 मधून **एक** प्रश्न व **उरलेला एक** प्रश्न कोणत्याही विभागातून सोडवा.
उत्तरांसाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.
शब्दकोशांचा उपयोग करण्यास **मनाई आहे**.
पाठ्यपुस्तके परीक्षेच्या वेळी नेता येणार **नाहीत**.
प्रत्येक उत्तर 500 ते 600 शब्दांच्या मर्यादेत असावे.
सर्व उत्तरांना समान वेळ द्यावा.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावी.
प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा उपप्रश्नांच्या शेवटी कंसात [ ] प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

DC (NH/JF) 81808/1
© UCLES 2014

CAMBRIDGE International Examinations

[Turn over

www.PapaCambridge.com



## विभाग – 1

**1 संत ज्ञानेश्वर – सार्थ श्रीज्ञानेश्वरी – अध्याय अठरावा**
**(ओवी क्रमांक 1704 ते 1713)**

*तैसे वस्तु जें असंख्यात। तया संख्या शते सात।*
*न होती तरी कोणा येथ। फावों शकतें ।।*
*मेघ सिंधूचे पाणी वाहे। तरी जग तयातेंचि पाहे।*
*कां जें उमप तें नोहें। ठाकतें कोण्हा।।*
*आणि वाचा जे न पवे। तें हे श्लोक न होते बरवे।*
*तरी कानें मुखें फावे। ऐसें कां होतें।।*
*म्हणौनि व्यासाचा हा थोरू। विश्वासि जाला उपकारू।*
*श्रीकृष्णउक्ती आकारू। ग्रंथाचा केला।।*
*आणि तोचि हा मी आतां। व्यासाची पदे पाहतां पाहतां।*
*आणिला श्रवणपथा। मऱ्हाठिया।।*
*व्यासादिकांचे उन्मेख। राहाटती जेथ साशंक।*
*तेथ मीही रंक एक। वाचाळी करीं।।*
*परी गीता ईश्वरू भोळा। ले व्यासोक्तिकुसुममाळा।*
*तरी माझीया दूर्वादळा। ना न म्हणे की।।*
*आणि क्षीरसिंधूचिया तटा। पाणिया येती गजघटा।*
*तेथ काय मुरकुटा। वारिजतसे।।*
*पांख फुटे पाखिरूं। नुडे तरी नभीच थिरू।*
*गगन क्रमी सत्वरू। तो गरूडही तेथ।।*
*राजहंसाचें चालणें। भूतळीं जालिया शाहाणे।*
*आणिक काय कोणे। चालावेंचिना।।*

**(अ)** **(i)** संत ज्ञानदेवांनी महर्षि व्यासांचे मोठेपण कशाप्रकारे सांगितले आहे?
**(ii)** ज्ञानदेवांची विनयी वृत्ती कशी आणि कुठे व्यक्त होते?
**(iii)** अठराव्या अध्यायातील वाङ्.मयीन सौंदर्याची सोदाहरण माहिती द्या. [25]

**अथवा**

**(ब)** ज्ञानेश्वरीचा अखेरचा अध्याय म्हणून असलेले अठराव्या अध्यायाचे महत्त्व विशद करा. [25]

© UCLES 2014

www.PapaCambridge.com

**2 संत तुकाराम – सार्थ श्री तुकारामाची गाथा
(अभंग क्रमांक 1417 ते 1419)**

*विठ्ठल माझी माय। आम्हां सुखा उणें काय।।
घेतों अमृताची धणी। प्रेम वोसंडलें स्तनीं।।
क्रीडा वैष्णवांच्या मेळीं। करूं आनंदाच्या जळीं।।
तुका म्हणे कृपावंत। ठेवी आम्हांपाशी चित्त।।*

*भक्तिसुखें जे मातले। ते कळिकाळा शूर झाले।।
हातीं बाण हरिनामाचे। वीर गर्जती विठ्ठलाचे।।
महा दोषां आला त्रास। जन्ममरणां केला नास।।
सहस्रनामाची आरोळी। एक एकाहूनी बळी।।
नाहीं आणिकांचा गुमान। ज्याचे अंकित त्यावांचून।।
तुका म्हणे त्यांच्या घरी। मोक्षसिद्धी या कामारी।।*

*पंधरा दिवसां एक एकादशी। कां रे न करिशी व्रतसारा।।
काय तुझा जीव जातो एका दिसें। फराळाच्या मिसें धणी घेसी।।
स्वहित कारण मानवेल जन। हरिकथा पूजन वैष्णवांचे।।
थोडे तुज घरीं होती उजगरे। देउळासी कां रे मरसी जातां।।
तुका म्हणे कां रे सुकुमार झालासी। काय जाब देसी यमदूतां।।*

**(अ)** **(i)** विठ्ठलभक्तिचे माहात्म्य तुकाराम महाराज कसे व्यक्त करतात?
**(ii)** ईश्वरनिष्ठेत कोणते सामर्थ्य तुकोबांना प्रतीत होते?
**(iii)** उपवासाचे महत्त्व महाराज कसे विशद करीत आहेत? [25]

**अथवा**

**(ब)** संत तुकारामांच्या अभंगांतून भावोत्कटता, सहजता आणि उत्स्फूर्तता ह्या वाड्.मयगुणांचा प्रभावी प्रत्यय कसा येतो? साधार स्पष्ट करा. [25]

© UCLES 2014

www.PapaCambridge.com

**3 विंदा करंदीकर – कविता – फितुर जाहलें तुजला अंबर**

*तुडुंब भरलिस मातृत्वानें,*
*काजळ वाहवलें गालावर.*
*मोहर गळला मदिर क्षणांचा;*
*कणी प्रगटली; निवलें अंतर.*

*त्या उत्कट एका झेपेंतच*
*पोंचलीस पुढच्या क्षितिजावर;*
*(मला उमगले मी अनवश्यक)*
*फितुर जाहलें तुजला अंबर!*

*त्या दिवशी मीं तुला शापिलें–*
*तुला वाटलें कौतुक तें तव!*
*तुडुंब भरलिस. ओळखलें मी*
*जामिन तुजला कुळी शहाण्णव.*

**(अ)** **(i)** स्त्रीमधील मातृत्वाचा गौरव करंदीकर कशाप्रकारे करतात?
**(ii)** 'फितुर जाहले तुजला अंबर!' हे कवी कोणाला उद्‌देशून आणि का म्हणतो?
**(iii)** ह्या कवितेची मध्यवर्ती कल्पना कोणती? [25]

**अथवा**

**(ब)** करंदीकरांच्या काव्यातील आशयाची आणि अभिव्यक्तीची प्रमुख वैशिष्ट्ये अभ्यासक्रमातील कवितांच्या आधारे विशद करा. [25]

© UCLES 2014

www.PapaCambridge.com

## विभाग – 2

**4 जयवंत दळवी – नाटक – संध्याछाया**

**(अ)** जयवंत दळवी यांनी 'संध्याछाया'मधून प्रभावीपणे रेखाटलेले वृद्ध माणसांच्या जीवनाचे नाट्य तुमच्या शब्दांत वर्णन करा. [25]

**अथवा**

**(ब)** नाटकाच्या विविध घटकांच्या आधारे 'संध्याछाया' या नाटकाची वाङ्.मयीन महत्ता विशद करा. [25]

**5 मराठी लघुकथा – कथासंग्रह**

**(अ)** 'माणूस जगतो कशासाठी?' या फडकेकृत कथेचे कथासूत्र उलगडून दाखवा. [25]

**अथवा**

**(ब)** 'मरण स्वस्त होत आहे' मधून कथाकाराने समाजवास्तवाचे प्रभावी चित्र कसे रेखाटले आहे? साधार विशद करा. [25]

**6 रणजित देसाई – कादंबरी – पावनखिंड**

**(अ)** 'पावनखिंड' या ऐतिहासिक कादंबरीचे वाङ्.मयीन मोठेपण कोणत्या घटकांत सामावलेले आहे? साधार विशद करा. [25]

**अथवा**

**(ब)** 'पावनखिंड' कादंबरीतील प्रभावी पात्रचित्रण आणि जीवनदर्शन तुमच्या शब्दांत साधार उलगडून दाखवा. [25]

© UCLES 2014

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

© UCLES 2014

BLANK PAGE

www.PapaCambridge.com

© UCLES 2014

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.

© UCLES 2014